# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः07.10.2024** **वारःसोमवार**

---

1. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना बंद होणार नाही-मुख्यमंत्र्यांचा पुनरुच्चार
2. 98व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी लोकसाहित्याच्या ज्येष्ठ अभ्यासक, संशोधक डॉक्टर तारा भवाळकर यांची निवड
3. मुंबईत चेंबूर इथं आग दुर्घटनेत सात जणांचा मृत्यू आणि
4. महिलांच्या टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारताचा पाकिस्तानवर सहा खेळाडू राखून विजय

**<u>मुख्यमंत्री</u>**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना अजिबात बंद होणार नाही, असा पुनरुच्चार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला आहे. छत्रपती संभाजीनगर इथ काल महिला सशक्तीकरण अभियानाअंतर्गत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांचा सन्मान आणि राज्यस्तरीय विविध योजनांचा लोकार्पण सोहळा मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत पार पडला, त्यावेळी ते बोलत होते.

लाडकी बहिण योजनेचे नोव्हेंबर महिन्याचे पैसे देखील महिलांच्या खात्यात जमा झाले असून, महिलांना लखपती करण्याचं सरकारचं उद्दीष्ट असल्याचं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. अडीच वर्षामध्ये महाविकास आघाडी सरकारनं केलेली कामं, आणि पुढच्या दोन वर्षात महायुती सरकारने केलेली कामं एकदा तपासून बघावी, असं सांगून त्यांनी विरोधकांवर टीका केली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार, यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते.

फडणवीस यांनी यावेळी शेतकऱ्यांसाठी दोन नवीन योजना आणल्याची माहिती दिली. राज्यातल्या शेतकऱ्याला पुढचे पाच वर्ष शेतीपंपाचं वीजेचं बिल माफ केलं असून, सगळ्या शेतकऱ्यांना केवळ दहा टक्के रक्कम भरुन सौर पंप देण्यात येणार असल्याचंही त्यांनी यावेळी जाहीर केलं.

बुलडाणा जिल्ह्यात खामगांव इथं दोन हजार 365 कोटींच्या विकासकामांचा शुभारंभ काल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाला. खामगाव तालुक्यातल्या पांदण रस्त्यांसाठी आगामी अर्थसंकल्पात 25 कोटी रुपये देणार असल्याचं फडणवीस यांनी यावेळी जाहीर केलं. शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जाणारा जिगाव सिंचन प्रकल्प आणि वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पांमुळे खामगांवमधली गावं पाणीदार होणार असून, शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पाणी येणार असल्याचं त्यांनी नमूद केलं. खामगांव इथल्या नवीन जिल्हा आणि अतिरिक्त सत्र न्यायालयाच्या कोनशिलेचं अनावरणही फडणवीस यांच्या हस्ते झालं.

**<u>अजित पवार</u>**

अहमदनगर जिल्ह्यातल्या अकोले तालुक्यातील सर्व गाव-वाड्या, वस्त्यांमध्ये दळणवळणाची सुविधा सक्षम करण्यासाठी शासन कटीबद्ध आहे, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. अकोले शहरातील विविध विकासकामांचे भूमिपूजन आणि लोकार्पण काल पवार यांच्या हस्ते झाल, त्यावेळी ते बोलत होते. राज्यात 1 ऑक्टोबरपासून शेतकऱ्यांच्या दूधाला 35 रूपये लीटर दर मिळणार आहे. राज्यातील 44 लाख शेतकऱ्यांचे 15 हजार कोटींचे वीज बील माफ करण्यात आले असून, मुख्यमंत्री बळीराजा

योजनेत शेतकऱ्यांना मोफत कृषी वीज पुरवठा करण्यात येत आहे. सर्व जाती धर्मांच्या विकासासाठी शासनाने स्वायत्त संस्थांची निर्मिती केली  असल्याचही अजित पवार यांनी यावेळी सांगितल.

**खरेदी-धाराशिव**

राज्य शासनाने नियुक्त केलेल्या नाफेड या केंद्र सरकारच्या मध्यवर्ती संस्थेला धाराशिव जिल्ह्यात 15 ठिकाणी खरेदी केंद्र सुरू करण्यास मंजुरी दिली आहे. या खरेदी केंद्रातून मूग, उडीद आणि सोयाबीनची आधारभूत दराने खरेदी करण्यात येणार आहे. 1 ऑक्टोबरपासून मूग आणि उडीद खरेदी सुरू करण्यात आली असून 15 ऑक्टोबरपासून सोयाबीन खरेदीला सुरुवात होणार आहे. जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असं आवाहन पणन महासंघाच्या वतीन करण्यात आलं आहे.

**सामंत-रत्नागिरी**

रत्नागिरी शहरात मजगाव रस्त्यावर उभारण्यात आलेल्या लोकमान्य बाळ गंगाधर टिळक बहुविशेषोपचार रोख-विरहित रुग्णालयाचं पालकमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते काल लोकार्पण करण्यात आलं. ठाण्यातल्या साधना फाउंडेशन ट्रस्टच्या माध्यमातून अशा प्रकारचं दुसरं रुग्णालय रत्नागिरीत सुरू झालं आहे. आपल्यामुळे कुटुंबाचा खर्च व्हायला नको म्हणून ग्रामीण भागातली गरीब जनता आजारपण अंगावर काढत असते. अशा गरिबांसाठी हे रुग्णालय सुरू करण्यात आलं आहे, असं पालकमंत्री सामंत यावेळी म्हणाले. शासनाच्या आरोग्यविषयक सर्व योजनांचा लाभ या रुग्णालयातून मोफत दिला जाणार आहे, असं जिल्हाधिकारी एम. देवेंदर सिंह यांनी सांगितलं. दरम्यान, रत्नागिरी जिल्ह्यातील लांजा तालुक्यातल्या भांबेड या गावातल्या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीचं भूमिपूजनही  काल पालकमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते झालं. सहा कोटी 22 लाख रुपये खर्च करून या केंद्राची इमारत एका वर्षात उभी राहणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

**साहित्य संमेलन-डॉ.तारा भवाळकर**

नवी दिल्लीत होणाऱ्या 98व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी लोकसाहित्याच्या ज्येष्ठ अभ्यासक, संशोधक डॉक्टर तारा भवाळकर यांची निवड करण्यात आली आहे. पुढच्या वर्षी 21, 22 आणि 23 फेब्रुवारी रोजी दिल्लीतल्या तालकटोरा स्टेडीअममध्ये हे मराठी साहित्य संमेलन होणार आहे. यापूर्वी 1954 मध्ये दिल्लीत झालेल्या संमेलनाचं अध्यक्षपद तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी भूषवलं होतं. 98व्या संमेलनाच्या अध्यक्षपदाच्या निवडीबाबत महामंडळ आणि इतर सहयोगी संस्थांच्या प्रतिनिधींची पुण्यात महाराष्ट्र साहित्य परिषदेत बैठक झाली; त्यानंतर काल पत्रकार परिषदेत डॉक्टर भवाळकर यांच्या नावाची घोषणा करण्यात आली. लोकसाहित्याचं अध्ययन, चिंतन, संशोधन आणि लेखनाच्या क्षेत्रात तारा भवाळकर यांनी महत्त्वाचं योगदान दिलं आहे. या विषयावर त्यांचे अनेक ग्रंथ प्रकाशित झाले असून अनेक पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आलं आहे. लोकसंस्कृती, मराठी भाषा आणि भारतीय संस्कृतीतील स्त्री प्रतिमा; या विषयावर त्यांनी ललित लेख, अनुवाद, व्याख्यानं, आकाशवाणीसाठी लेखन, तसंच मराठी विश्वकोश, मराठी वाङ्मयकोशात अनेक महत्त्वाच्या नोंदी लिहिल्या आहेत. साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाल्यावर आपल्या भावना व्यक्त करताना डॉक्टर तारा भवाळकर म्हणाल्या….

**सामूहिक अत्याचार प्रकरण**

पुण्यातील बोपदेव घाटात तरुणीवर झालेल्या सामुहिक बलात्कार प्रकरणी तीन हजार मोबाइल वापरकर्त्यांची माहिती पोलिसांनी संकलित केली आहे. त्याआधारे पोलिसांकडून तांत्रिक विश्लेषण सुरू करण्यात आले आहे. या प्रकरणी दोनशेहून अधिक सराईतांची चौकशी करण्यात येणार आहे. घाटापासून 70 ते 80 किलोमीटरपर्यंतचं सीसीटीव्ही चित्रीकरण संकलित करण्यात येणार आहे. अशी माहिती पोलीस उपायुक्त आर राजा यांनी दिली आहे.

**वासंती घोरपडे-निधन**

मराठी चित्रपटसृष्टीतील पहिल्या बालतारका, वासंती घोरपडे- पटेल ह्यांचं काल वृद्धापकाळानं निधन झालं. त्या 101 वर्षांच्या होत्या. वासंती घोरपडे यांचा अनेक मूकपटांतून आणि बोलपटांतून त्यांनी भूमिका केल्या. धर्मात्मा, अमर ज्योती, कुंकू

यासारख्या चित्रपटात त्यांनी भूमिका साकारल्या. वासंतीबाईंनी शास्त्रीय संगीताची तालीमही घेतली होती. अनेक नामवंत संगीतकारांची गाणी त्यांनी गायली.

**पंडिता डॉ. सुजाता नातू-निधन**

ज्येष्ठ कथक नृत्यांगना, गुरु पंडिता डॉक्टर सुजाता नातू यांचं काल पुण्यात निधन झालं. त्या 83 वर्षांच्या होत्या. कथक नृत्यकलेला जनमानसात प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यात आणि ही कला घराघरात पोहोचविण्यात सुजाता नातू यांचं मोठं योगदान आहे.

**आग**

मुंबईत चेंबूर इथल्या सिद्धार्थ कॉलनी परिसरात काल पहाटे एका दुमजली इमारतीला लागलेल्या भीषण आगीत एकाच कुटुंबातील सात जणांचा होरपळून मृत्यू झाला. इमारतीचा तळ मजला दुकान म्हणून तर वरचा मजला निवासस्थान म्हणून वापरला जात होता. तळमजल्यावरील विजेच्या तारांजवळ शॉर्टसर्किट झाल्याने ही आग लागल्याचे अग्निशमन अधिकाऱ्यांनी सांगितलं. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल दुर्घटनास्थळाला भेट देऊन पाहणी केली आणि मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी पाच लाखांची मदत शासनातर्फे जाहीर केली.

**महिला क्रिकेट**

दुबई इथं सुरू असलेल्या महिलांच्या टी-ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत भारतानं काल पाकिस्तान संघाचा 6 खेळाडू राखून पराभव केला. पाकिस्तान संघानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना दिलेलं 108 धावांच लक्ष्य भारतीय संघानं अठराव्या षटकात 4 खेळाडूंच्या बदल्यात पूर्ण केल. शेफाली वर्मानं 32 तर जेमीहा रॉड्रीग्जनं 23 धावा करून भारताचा विजय साकारला.

**पुरुष क्रिकेट**

पुरुषांच्या क्रिकेटमध्ये तीनपैकी पहिल्या टी-ट्वेंटी सामन्यात भारतानं काल बांग्लादेशवर ग्वाल्हेर इथं सात गडी राखून विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना बांग्लादेशचा संघ 127 धावांमध्ये गारद झाला, भारतानं बाराव्या षटकात हे लक्ष्य सहज पार केलं. दुसरा सामना 9 ऑक्टोबरला दिल्लीत खेळवला जाईल.

**हवामान**

रत्नागिरी जिल्ह्यात काल संध्याकाळनंतर अनेक ठिकाणी सोसाट्याच्या वाऱ्यांसह मुसळधार पाऊस पडला. कोकण, मध्य महाराष्ट्रात वीजा आणि जोराचे वारे यांच्यासह आज पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.